## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ३ ची जबानी

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | - | संदिप पांडुरंग श्रीनाथ, |
| माझे वय | - | ३८ वर्षे, |
| व्यवसाय | - | शेतीकाम, |
| राहणार | - | मुंडगाव ता. अकोट जि. अकोला. |

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. जे.डब्ल्यू. गावंडे यांचे मार्फत.**

**१.** अकोट पोलिसांनी मला घटनास्थळ पंचनाम्यासाठी बोलाविले होते. त्यांनी मला सन २०१५ मध्ये दुपारी ०३.०० ते ०४.०० च्या दरम्यान पंचनाम्यासाठी बोलाविले होते. सदर ठिकाण हे अपघाताचे होते. त्या ठिकाणी माझ्या मित्राच्या वडिलांचा अपघात झाला होता. सदर घटनास्थळ हे मुंडगाव ते लामकाणी रस्त्यावर होते. घटनास्थळ पंचनाम्याच्यावेळी माझा फोटो घेतला होता. पंचनाम्यात काय लिहिले होते ते मला माहिती नाही. (सरकारी वकिलांनी साक्षीदारास घटनास्थळ पंचनामा दाखविला.) आता मला दाखविलेल्या पंचनाम्यावर अनुक्रमांक दोन वर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहिती नाही. (सहीस **निशाणी पी३** देण्यात येते.) आता मला दाखविलेल्या फोटोमध्ये मी दिसत आहे. सदर फोटो घटनास्थळावर काढला होता. (सदर फोटोला **वस्तुचिन्ह अ** देण्यात येते.)

**(साक्षीदार सत्य लपवित असल्याचे सांगून सहायक सरकारी वकील यांनी उलट तपासणीच्या स्वरुपाचे प्रश्न विचारण्यासाठी परवानगी मागितली. पुरावा कायदा कलम १५४ अन्वये परवानगी देण्यात येते)**

२. हे म्हणणे खरे आहे की ज्या ठिकाणी माझ्या मित्राच्या वडिलांचा अपघात झाला होता त्या ठिकाणाचा घटनास्थळ पंचनामा होता. हे म्हणणे खरे आहे की ते ठिकाण मुंडगाव ते लामकाणी रोडवरील प्रविण अंबळकार याच्या शेताजवळचे होते. हे म्हणणे खरे आहे की त्या ठिकाणी पोलिसांनी दिसत्या परिस्थितीप्रमाणे पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे आहे की पंचनाम्यात जे लिहिले आहे ते बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की पंचनाम्यात लिहिलेले बरोबर असल्याने मी पंचनाम्यावर सही केली होती. (साक्षीदाराने पंचनाम्यावरील सही व पंचनाम्यातील मजकुर बरोबर असल्याचे मान्य केल्याने सदर पंचनाम्यास **निशाणी पी४** देण्यात येते.) हे म्हणणे खरे आहे की सरतपासामध्ये पंचनामा आठ ते नउ वर्षांपुर्वीचा असल्यामुळे त्यामध्ये काय लिहिले आहे हे माझ्या लक्षात नव्हते. हे म्हणणे खरे आहे की पंचनामा वाचून दाखविल्यावर व समजून सांगितल्यावर मला सर्व लक्षात आले.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.ए.एस.वैराळे यांचे मार्फत.</u>**

(मध्यांतराचा कालावधी असल्यामुळे उलटतपास तहकुब.)

स्वा/–
दि.२५/१/२०२४. भानुप्रताप ब. चौहान
अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोट

**<u>मध्यांतरानंतर उलटतपास शपथेवर सुरु.</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळावरील रस्तावरील वळण एल आकाराचा आहे. हे म्हणणे खरे आहे की त्या वळणामुळे वाहनाचा वेग १० ते १५ किला मिटर प्रति तासापेक्षा जास्त ठेवता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळावर रात्रीच्या वेळी उजेडाची कोणतीही व्यवस्था नाही. घटनास्थळावरील रस्ता घटनेच्या काळात उखडलेला होता किंवा कसे ते माझ्या लक्षात नाही. जी जागा मला घटनास्थळ म्हणून दाखविली त्या ठिकाणी कोणतेही रक्ताचे डाग नव्हते. मला पंचनाम्याकरिता कोणतेही समन्स मिळाले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की लामकाणी ते मुंडगाव जाणाऱ्या रस्त्यावर घटनास्थळ उजव्या बाजुला आहे. हे म्हणणे खरे आहे की लामकाणी ते मुंडगाव जाणाऱ्या रस्त्यावर घटनास्थळ रस्त्याच्या चुकीच्या बाजुला आहे. पंचनामा निश्चित किती वाजता सुरु केला हे मला सांगता येणार नाही. घटनास्थळ मला पोलीस व माझा मित्र आकाश काळे याने दाखविले. हे म्हणणे खरे आहे की मी गेलो त्यावेही घटनास्थळावर कुठलेही वाहन पडलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी फिर्यादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की वस्तूचिन्ह अ कडील फोटो कोणत्या तरी वेगळयाच ठिकाणाचा आहे.

उलटतपास संपुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा/-
दि. २५/०१/२०२४. भानुप्रताप ब. चौहान
अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट नं.१